# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Missing Persons**

**Police Station** :- **Washim Police**

**Date of Good Work done** :- **10/02/2022**

**Brief of the work done :-**

वाशिम पोलीस दलातील कार्यरत असलेल्या मिसींग सेल ने मागील वर्षभरात विशेष कामगिरी करून एकूण 389 हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचे कुटुंब सावरले आहे. यामध्ये 151 पुरुष व 238 महिलांचा समावेश आहे.

# २०२१ वर्षी हरविलेल्या १५२ पुरुष व २३८ महिलांचा शोध

- पोलिसांच्या मदतीने जिल्ह्यातील अनेक कुटुंब सावरली
- मिसींग डेस्कद्वारे ५१ महीला, ७ मुली, २ मुले व १४ पुरुषाचा घेतला शोध

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ जिल्ह्यातील अनेक कुटुंबे पोलिसांच्या मदतीने सावरलेली आहेत. सन २०२१ मध्ये जिल्ह्यात १८ वर्षावरील एकुण १८७ पुरुष हरविले असून, त्यापैकी १५२ पुरुषांचा शोध लावण्यात आला आहे. तसेच २९० हरविलेल्या स्त्रिया पैकी २३८ महीलांचा शोध लावण्यात आला आहे. तसेच मिसींग डेस्कद्वारे सन-२०२१ या कालावधीत ५१ महीला, ७ मुली, २ मुले व १४ पुरुषाचा शोध घेण्यात आला आहे. तसेच मिसिंग राहिलेल्यांचा शोध घेण्यात येत आहे. अशी माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक बच्चन सिंह यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील अनेक कुटुंबे पोलिसांच्या मदतीने सावरण्यात आलेले आहेत. मिसिंग डेस्क कार्यवाही दरम्यान हरविलेल्या महिलांचे नातेवाईकास संपर्क करून महिला घरी परत आली. किंवा कसे याबाबत फोनद्वारे विचारणा केली असता पो.स्टे. मंगरुळपीर हद्दीतील मिसींग महिलाबाबत २२ सप्टेंबर २०२१ रोजी मिसींगची पो.स्टे.ला तकार प्राप्त होती. तरी संबंधित मिसिंग महिला १६ ऑक्टोबर २०२१ रोजी पोलीसांनी अतोनात परिश्रम करुन सदर महिलेचा शोध घेतला असता मिळुन आली. तसेच पो.स्टे. अनसिंग हद्दीतील एक महिला व तिच्या लहान मुलांसह ५ एप्रिल २०२१ रोजी हरविली असता त्याबाबत पो.स्टे अनसिंगला मिसिंग दाखल करण्यात आली होती. सदर हरविलेला महिला व तिचे लहान मुलांचा पोलीसांनी अथक परिश्रम करून शोध घेतला. आणि त्यांना त्यांचे नातेवाईकांचे ताब्यात दिल्याने संबंधीत तक्रारदार यांनी भावनिक होवुन पोलीसांचे सहकार्यामुळे महिला घरी परत आल्याने पोलीस विभागाचे कार्यवाहीमुळे समाधान व्यक्त केले.

**संकटात सापडलेल्या व्यक्तींकरीता डायल ११२ नंबरची स्थापना**

महिला व मुलाच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथक याची स्थापना करून गरजुना विहित वेळेत मदत उपलब्ध करुन दिली, पिडीत, गरजु संकटात सापडलेल्या व्यक्तीना तात्काळ मदत उपलब्ध व्हावी, याकरीता डायल ११२ ची स्थापना करण्यात आली. त्यालाही नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.



जिल्ह्यात महिला व पुरष हरवल्याच्या विविध पोलिस स्टेशनमध्ये तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी त्यावर कार्यवाही करुन संबंधित महिला व पुरषांचा शोध घेतलेला आहे. पोलिसांच्या मदतीने अनेक कुटुंबे सावरलेली आहेत. तसेच जिल्ह्यात १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२२ या कालावधी दरम्यान जिल्ह्यातील हरविलेले, पळविले मुले-मुली व महीला -पुरुष यांचा शोध घेण्यासाठी पोलिस अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच महीला पोलीस कर्मचारी यांचे विशेष शोध पथक तयार करण्यात आले आहे.

**बच्चन सिंह,**
**जिल्हा पोलिस अधिक्षक, वाशिम.**

जिल्ह्यात १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२२ या कालावधी दरम्यान जिल्ह्यातील हरविले, पळविले मुले-मुली व महीला -पुरुष यांचा शोध कामी पोस्टे रावर अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच महीला पोलीस कर्मचारी यांचे विशेष शोध पथक तयार करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक बच्चन सिंह यांनी दिली आहे. (का.प्र.)